**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक १९ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **राज्यातल्या नागपूर, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि रामटेक या पाच मतदारसंघात पाच वाजेपर्यंत सरासरी ५४.८६ टक्के मतदान.**
2. **थीम-बेस्ड मतदान केंद्र आणि मतदारांच्या उत्साहाने मतदानाचा दिवस ठरला वैशिष्ट्यपूर्ण.**
3. **विदर्भातील विकास प्रकल्पामुळे आता विदर्भ मागासलेपणातून पुढं जात असल्याचं पंतप्रधान आणि भाजपचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचं वर्ध्यात प्रतिपादन.**
4. **43 पूर्णांक 3 अंश सेल्सियस कमाल तापमानासह अकोला जिल्हा विदर्भात सर्वाधिक उष्ण.**

*****

**मतदान टक्केवारी**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याचं मतदान आज संपन्न होत आहे. या टप्प्यात १७ राज्यं आणि चार केंद्रशासित प्रदेशांमधल्या १०२ मतदारसंघांचा समावेश आहे. राज्यातल्या नागपूर, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली - चिमूर आणि रामटेक या पाच मतदारसंघात आज ५ वाजेपर्यंत सरासरी ५४.८५ मतदान झालं. संध्याकाळी 5 वाजेपर्यंत नागपूर मतदारसंघात ४७.९१ टक्के, भंडारा- गोंदियात ५६.८७ टक्के, चंद्रपूर ५५.११ टक्के, गडचिरोली-चिमूर ६४.९५ टक्के, तर रामटेक मतदारसंघात ५२.३८ टक्के मतदान झालं. आतापर्यंत हाती आलेल्या आकडेवारीनुसार नागपूर लोकसभा क्षेत्रातील नागपूरपूर्व मतदार संघात सर्वाधिक ५१.१७ टक्के इतकं मतदान झालं आहे. तर रामटेक मध्ये उमरेड या मतदार संघात सर्वाधिक ६०.७४ टक्के एवढं मतदान

झालं आहे. तत्पूर्वी नागपूर जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांनी मतदान वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली.

***आज १९ तारखेला नागपूर आणि रामटेकमध्ये मतदान आणि जोशमध्ये चालू झालेला आहे. त्या एक वर्षांपासून या मिशन डिस्टिंगशनसाठीच्या आमच्या पूर्ण टीम काम करत आहेत. ते आज आपल्याला अचिव्ह करायचा आहे, आणि आम्हाला भरोसा आहे. ७५ टक्केचा हा एम आपण गाठून नागपूरला डिस्टिंगशनमध्ये निश्चितच आपण पास करू.***

रामटेकमध्ये सर्वाधिक २८, नागपुरात २६, भंडारा-गोंदियात १८, चंद्रपूरमध्ये १५ आणि गडचिरोली-चिमूरमध्ये १० उमेदवार रिंगणात आहेत. या ५ लोकसभा मतदारसंघात एकूण ९५ लाख ७० हजार ७१३ मतदार आहेत. त्यापैकी ९ हजार ४१६ मतदारांनी टपालाद्वारे तर ६ हजार ६३० जणांनी घरुन मतदानाचा पर्याय स्वीकारला. सर्वच मतदारसंघांमध्ये उमेदवारांसह नामवंत व्यक्तींनी मतदान केलं. यामध्ये महायुतीचे उमेदवार नितीन गडकरी, महाविकास आघाडीचे विकास ठाकरे, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भंडारा-गोंदिया मतदारसंघात काँग्रेस उमेदवार प्रशांत पडोळे, भाजप उमेदवार सुनिल मेंढे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार प्रफुल्ल पटेल, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, भाजपचे महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांचा समावेश आहे. याशिवाय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विलास मूत्तेमवार नागपूरचे पोलीस आयुक्त डॉ.रविंद्र कुमार सिंगल,स्विपच्या नोडल अधिकारी तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांनीही मतदानाचा हक्क बजावला. राज्याचे अन्न आणि औषध प्रशासनमंत्री धर्मरावबाबा आत्राम, खासदार अशोक नेते, आ.डॉ.देवराव होळी, आ.कृष्णा गजबे यांनी गडचिरोली जिल्ह्यातील

आपापल्या मतदान केंद्रांवर मतदान केले. गडचिरोली पंचायत समिती येथील पिंक मतदान केंद्राला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आयुषी सिंह यांनी आज भेट दिली.

**मतदान/विशेष संकल्पना केंद्र**

आज पूर्व विदर्भातील पाच लोकसभा मतदारसंघात मतदान पार पडलं. यंदाचं मतदान विविध कारणांमुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरलं. सकाळी ७ ते सायंकाळी ६ पर्यंत मतदानाचा कालावधी होता. मात्र गढ़चिरौली लोकसभा क्षेत्रातील चार मतदारसंघात -आमगांव, आरमोरी, गढ़चिरौली, अहेरी आणि भंडारा-गोंदिया लोकसभा क्षेत्रातील अर्जुनी मोरगांव इथे हि वेळ सकाळी 7 ते दुपारी 3 वाजेपर्यंत होती. जगातील सर्वांत कमी उंचीची महिला ज्योती आमगेने संपूर्ण परिवारासह नागपुरात मतदान केलं. याशिवाय लग्न संरमभात व्यस्त असलेल्या अनेक कुटुंबीयांनी आवर्जून मतदान केल्याचं आज दिसून आल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे. नागपूर जिल्हा प्रशासनाद्वारे सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी याकरिता थीम बेस्ड मतदान केंद्रांची स्थापना विविध ठिकाणी करण्यात आली होती. या अंतर्गत नागपूरतील पांचपावलीतील सिंधु महाविद्यालयात इंद्रधनुष्य ही थीम घेऊन तृतीयपंथियासाठी विशेष मतदान केंद्र उभरण्यात आल. तर शंकर नगर येथील सरस्वती विद्यालयातील मतदान केंद्र टेक्स्टाईल या थीमवर आधारित होतं. येथे विविध वस्त्र उद्योगातील हातमागाचे कापड तसेच कलाकृतीच्या वस्तू प्रदर्शविण्यात आल्या होत्या. तर रामटेकच्या कट्टा ब्लॉकमधील मतदान केंद्र जंगल आणि आदिवासींच्या संस्कृतीवर आधारित होतं. गडचिरोली शहरात नवमतदार, दिव्यांग, वृध्द मतदारांची मतदार रथामध्ये बसवून वाजत गाजत मिरवणूक काढून मतदान केंद्रापर्यंत नेण्यात आलं. खबरदारीचा उपाय म्हणून गडचिरोली जिल्ह्यातल्या सिरोंचा इथ पोलिसांनी हेलिकॉप्टरच्या सहाय्यानं ३

अतिरीक्त इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पाठवली. वेळेवर बिघाड झाला तर ही मतदान यंत्र वापरण्यासाठी राखीव आहेत. गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी आज गडचिरोली इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरपालिका शाळेत मतदान केलं. आरमोरी तालुक्यातील वैरागड येथील मंजुळाबाई श्रीराम ढेंगरे यांनी वयाच्या ९५व्या वर्षी मतदानाचा हक्क बजावला.भंडारा जिल्ह्यातल्या मोहाडी तालुक्यातल्या खुशारी गावात श्रीहरी गायधने या वरानं लग्न करण्यापूर्वी मतदानाचा हक्क बजावला. भंडारा जिल्ह्यात बेला इथल्या मतदान केंद्रावर उभारलेल्या सेल्फी पॉइंटवर मतदारानी  गर्दी केल्याचं दिसून आलं. चंद्रपुरातही एका वरानं लग्नापूर्वी मतदानाचा हक्क बजावला.

**पंतप्रधान- सभा**

पुढील पाच वर्षात गरिबांसाठी 3 कोटी घरे बनतील, प्रत्येक परिवारापर्यंत पाईपने पाणी आणि गॅस पोहोचेल तसंच परिवारातील जे 70 वर्षावरील आहेत त्यांना  5 लाखापर्यंतचे उपचार मोफत करण्याची योजना आमच्या सरकारनं आणली आहे आणि कितीही अडचणी आल्या तरी आम्ही दिलेली आश्वासन पूर्ण करू असं प्रतिपादन पंतप्रधान आणि भाजपचे वरिष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी आज केलं.

वर्ध्याच्या आष्टी तालुक्यातील तळेगाव इथं एका प्रचार सभेला संबोधित करताना ते आज बोलत होते. एकट्या वर्धा जिल्ह्यात दीड लाखाहून अधिक महिला स्वयं सहायता गटामध्ये कार्यरत आहेत. येत्या पाच वर्षात महिलांना वेगवेगळ्या क्षेत्रांचा अनुभव मिळण्यासाठी ड्रोन दीदी, लखपती दीदी यांसारख्या योजना आपल्या सरकारनं आखल्या असल्याची माहिती त्यांनी दिली. गेल्या दहा वर्षात 25 कोटी लोकांना गरीबीतून बाहेर काढलं. तसंच 4 कोटी गरीब परिवारांना प्रधानमंत्री

आवास योजनेअंतर्गत पक्की घरे दिली. 11 कोटी लोकांना पिण्याच्या पाण्याचं कनेक्शन, प्रत्येक गावात वीज पोहोचवण्याचं काम आमच्या सरकारने केलं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

**‘मतदानाचा मागोवा’**

लोकसभा निवडणुकीतील पहिल्या टप्प्यासाठी आज राज्यातील नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, रामटेक आणि भंडारा-गोंदिया या पाच लोकसभा मतदारसंघांत मतदान घेण्यात आलं. आजच्या मतदानाचा आढावा घेणारा ‘मतदानाचा मागोवा’ हा विशेष रेडिओ ब्रिज कार्यक्रम आकाशवाणी मुंबईच्या प्रादेशिक वृत्तविभागातर्फे सादर करण्यात येणार आहे. आज संध्याकाळी सव्वा आठ वाजता आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**मतदान नाकारले**

चंद्रपूरचे अपक्ष उमेदवार मिलिंद दहिवले यांनी आपल्या नावापुढे मतदान केंद्रासमोर असलेल्या मतपत्रिका नमुन्यात डिलीटेड असा शिक्का मारल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला. दहिवले यांच्या मातोश्री गेली अनेक वर्षे मतदान करत असताना त्यांचे यादीत नाव नसल्याने त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव घेतली. मात्र जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत सध्याच काही करण्यास असमर्थता दर्शवली. दुसरीकडे मिलिंद दहिवले यांच्या नातवाईकाकडे नव्या पद्धतीचे वोटर कार्ड असूनही त्यांना मतदान करता आले नाही. मतदार यादी नावच नसल्याने त्यांची इच्छा असूनही मताधिकार बजावता आला नाही. चंद्रपूर जिल्ह्यात अशा प्रकारच्या अनेक तक्रारी या निवडणुकीत पुढे आल्या असून यावर प्रशासन काय उपाययोजना करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तिसरा टप्पा**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपणार आहे. या टप्प्यात ९४ मतदारसंघांमध्ये सात मे रोजी मतदान होणार आहे. यामध्ये राज्यातल्या उस्मानाबाद, लातूर, रायगड, बारामती, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या मतदारसंघांचा समावेश आहे. रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार नारायण राणे आज उमेदवारी अर्ज दाखल करत आहेत. भाजप नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुजरात मधल्या गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

**हवामान**

आज विदर्भात सर्वाधिक तापमान अकोला इथं 43 पूर्णांक 3 अंश सेल्सियस तर त्यापाठोपाठ चंद्रपूर इथ 43 पूर्णांक 2 इतक्या कमाल तपमानची नोंद झाली आहे. विदर्भात सर्वत्र तापमान 40 अंशाच्या पुढे असून नागपुरात 40 पूर्णांक 8 अंश सेल्सियस कमाल तापमान नोंदविण्यात आलं आहे. विदर्भाच्या बुलढाणा इथं 41 पूर्णांक 2, यवतमाल 42 अंश, वाशिम 41 पूर्णांक 4, वर्धा 41 पूर्णांक 5, गोंदिया 40 पूर्णांक 2 आणि भंडारा 40 पूर्णांक 5, गडचिरोली इथं 41 पूर्णांक 8 आणि अमरावती इथं 42 अंश सेल्सियस इतकं कमाल तापमान नोंदविण्यात आलं. विदर्भात आज नागपूरसह भंडारा, गोंदिया, अमरावती, अकोला, बुलढाणा आणि वाशिम इथं हवामान कोरडं राहणार आहे. याठिकाणी उन्हाचा पारा चढत आहे. यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर आणि वर्धा इथं मात्र आज हलक्या ते मध्यम पावसासह वादळाचा इशारा देण्यात आला आहे. आज पूर्वविदर्भातील नागपूर, भंडारा-गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर आणि रामटेक इथं

लोकसभा निवडणुकांचे मतदान सुरू असून मतदान केंद्रांवर उष्मा-प्रतिबंधक अनेक उपाययोजना करण्यात आल्या होत्या.

**फौजदारी न्याय**

जुने वसाहतवादी कायदे रद्द करण्यासाठी आणि नागरिककेंद्रित आणि चैतन्यशील लोकशाहीच्या गरजा पूर्ण करणारे कायदे लागू करण्यासाठी देशातील फौजदारी न्याय व्यवस्थेची पुनर्रचना करणारे तीन कायदे तयार करण्यात आले आहेत.या कायदेविषयक नियमांबाबत विशेषतः हितधारकांमध्ये आणि कायदा क्षेत्रातील संबंधितांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी विधी आणि न्याय मंत्रालयाने उद्या 20 एप्रिल रोजी नवी दिल्लीतील जनपथ येथील डॉ. आंबेडकर आंतरराष्ट्रीय केंद्रात 'फौजदारी न्याय व्यवस्थेच्या प्रशासनातील भारताचा प्रगतीशील मार्ग' या परिषदेचं आयोजन केलं आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती डॉ. डी.वाय. चंद्रचूड हे प्रमुख पाहुणे म्हणून यावेळी उपस्थित राहणार आहेत.

******